| S.No<br>अ. क्र. | Name of the Committee<br>समितीचे नाव | Total Members<br>एकूण संख्या | Purpose<br>उद्देश /हेतू | Type<br>प्रकार | Frequency of Meetings<br>सभेची वेळ | Docmet available forPublic<br>नागरिकांसाठी उपलब्ध माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मा.मुख्य सभा | १६९ | महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मध्ये निरनिराळ्या कलमांमध्ये कार्यक्षेत्र नमूद केलेले आहे. | मासिक | दुपारी ३ वाजता | |
| २ | स्थायी समिती | १६ | महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मध्ये निरनिराळ्या कलमांमध्ये कार्यक्षेत्र नमूद केलेले आहे. | साप्ताहिक | सकाळी ११-३० वा. | |
| ३ | शहर सुधारणा समिती | १३ | १. नगर अभियंता यांचा विभाग व तत्संबंधी सर्व प्रश्न.<br>२. मार्ग, भवन, पाणीपुरवठा आणि जलशाला (**Water works** ) खुली मैदाने व उद्याने, अग्निशामक - दल, कर्मशाळा, यांत्रिक स्थापत्याची शाखा आणि स्थापत्य विभागातील इतर कामे.<br>३. सार्वजनिक सुरक्षितता आणि सुखसोयीसंबंधी इतर प्रश्न.<br>४. भूमी आणि जिंदगी विभाग व तत्संबंधी सर्व प्रश्न.<br>५. कामांची तपासणी आणि आवश्यकता वाटेल त्यावेळी महापालिका आयुक्त यांच्याकडून निवेदने मागविणे.<br>६. शहराच्या सर्वसाधारण सुधारणांसंबधी तसेच निर्देशक योजना (**Master Plan** ) नगररचना योजना औद्योगिक, वसाहती, गृहनिर्माण योजना यासंबंधीचे सर्व प्रश्न.<br>७. गलिच्छ वस्ती सुधारणा, निर्मुलन घरबांधणी व समाज कल्याण संबंधीचे प्रश्न. | पाक्षिक | सकाळी ११-३० वा. | |
| ४ | महिला व बाल कल्याण समिती | १३ | १. महिला व बालांच्या कल्याणकारी विविध योजना व | पाक्षिक | दुपारी ४ वाजता | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | कार्यक्रमांबाबतच्या समिती विषयाचा विचार करणे.<br>२. महानगरपालिकेची बाह्य औषधालये, रूग्णालये ( सांसर्गिक रोगाचे रूग्णालय धरून) प्रसूतिगृहे, वैद्यकीय आणि शुश्रूषात्मक सहाय्य आणि ज्या वैद्यकीय संस्थांना महानगरपालिका आर्थिक मदत करते त्यासंबंधीचे सर्व प्रश्न.<br>३. आरोग्य विभाग – रस्ते सफाई, कचरावाहतूक (शहर सुधारणा समितीच्या अधिकारात येणाऱ्या यांत्रिक विभागासंबंधी प्रश्न सोडून), माध्यमिक व तांत्रिक शाळेसंबंधीचे सर्व प्रश्न. | | | |
| ५ | विधी समिती | १३ | १. महानगरपालिकेच्या कारभारासंबंधी, महानगरपालिका अधिनियम आणि इतर अधिनियम, पोटनियम, विनियम,नियम यातील तरतुदींचा अर्थ लावण्याबाबत आणि त्यामधील सुधारणांबाबत उपस्थित होणारे प्रश्न.<br>२. कर आकारणी कर संकलन विभाग.<br>३. निवडणुकांविषयक प्रश्न.<br>४. आयातकर विभाग.<br>५. गणना विभाग<br>६. अनुज्ञापत्र (परवाना ) विभाग (आरोग्य आणि आरोग्येतर)<br>७. दुसऱ्या विशेष समित्यांच्या कक्षेत न येणारे इतर सर्व संकिर्ण प्रश्न. | पाक्षिक | दुपारी ४ वाजता | |
| ६ | क्रीडा समिती | १३ | भारतीय व परदेशी खेळांना वा त्यासंबंधीच्या इतर कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासंबंधीचे सर्व प्रश्न. | पाक्षिक | ---- | |
| ७ | नाव समिती | १३ | शहरातील रस्ते,पूल,चौक, भवने,उद्याने यांना नावे देणे. | मासिक | ---- | |
| ८ | ऑडिट उपसमिती | ७ | ऑडिट आक्षेपांवर खात्याकडून खुलासे मागवून त्यावर चर्चा करुन ते निकाली काढणे.व स्थायी समितीस शिफारस करणे. | आवश्यक्तेनुसार | ---- | |
| ९ | अपिल उपसमिती | ८ | महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ नुसार सेवकांकडून आलेल्या अपिल अर्जावर चर्चा करुन निर्णय घेणे व स्थायी समितीस शिफारस करणे. | आवश्यक्तेनुसार | ---- | |
| १० | पक्षनेते सभा | ९ | मनपाची निरनिराळी अधिकार क्षेत्रे,सभासद,अधिकारी | आवश्यक्तेनुसार | ---- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | यांच्यात समन्वय राखुन महत्वाच्या धोरणांचा विचार विमर्श करून निणर्य घेणे, महत्वाच्या योजना कोणत्या पध्दतीने व प्राधान्याने घ्यावयाच्या त्यासाठी मनपा वर किती आर्थिक बोजा घ्यावयाचा वगैरेबाबत निर्णय घेणे. | | | |